## MAHARASHTRA ACT No. XLV OF 1974

## THE SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSY WOMEN'S UNIVERSITY (VALIDATING PROVISIONS) ACT, 1974

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १० सप्टेंबर १९७४ रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे, सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

एम्. ए. घोत्रे,
सह-सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## MAHARASHTRA ACT No. XLV OF 1974

## AN ACT TO VALIDATE THE CONTINUANCE IN OFFICE AND ACTS OF VICE-CHANCELLOR OF THE SHREEMATI NATHIBAI DAMODAR THAKERSEY WOMEN'S UNIVERSITY.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर, महाराष्ट्र शासन **राजपत्रात** दिनांक १३ सप्टेंबर १९७४ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५

**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू पदावर असण्याचे चालू राहणे व त्यांची कृत्ये विधिग्राह्य करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९४९ यान्वये निवडलेल्या, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू श्रीमती शारदा दिवाण यांच्या पदाची मुदत दिनांक १ डिसेंबर १९७२ रोजी संपली होती ;

**आणि ज्याअर्थी,** अधिसभेने नवीन कुलगुरूची निवड केली होती, परंतु विद्यापीठाशी संबंधित विधी सुधारण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता, म्हणून कुलपतीने ही निवड कायम केली नव्हती आणि प्रस्तावित विधिविधानान्वये श्रीमती शारदा दिवाण यांचा उत्तराधिकारी यथोचित रीत्या निश्चित होईतोपर्यंत त्यांनी त्या पदावर राहण्याचे चालू ठेवण्याबद्दल त्यांना निदेश दिला होता ;

**आणि ज्याअर्थी,** त्यानुसार श्रीमती शारदा दिवाण यांचे पदावर असल्याचे चालू राहिले व त्यांनी, कुलगुरूंच्या सर्व शक्तींचा वापर केला व कर्तव्ये पार पाडली असे समजण्यात आले आहे ;

**आणि ज्याअर्थी,** श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९४९ हा निरसित करण्यात येऊन त्याऐवजी, दिनांक २१ मे १९७४ रोजी, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९७४ हा नवीन अधिनियम करण्यात आला ;

**आणि ज्याअर्थी,** श्रीमती शारदा दिवाण यांची उक्त पदावरील नियुक्ती नियमानुकूल करणे आणि कुलगुरू म्हणून त्यांनी केलेल्या सर्व कृत्यांची विधिग्राह्यता सुनिश्चित करणे इष्ट होते ;

**आणि ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी**, उपरोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता ताबडतोब कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक होते अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल, महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाल्याने, त्यांनी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (विधिग्राह्य करणारे उपबंध) अध्यादेश, १९७४ हा दिनांक १२ जुलै १९७४ रोजी प्रख्यापित केला;

**आणि ज्याअर्थी**, आता उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी**, भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (विधिग्राह्य करणारे उपबंध) अधिनियम, १९७४ असे म्हणता येईल.

(२) तो, दिनांक १२ जुलै १९७४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

**सन १९४९ चा मुंबई अधिनियम ५१ हा पुन्हा प्रवर्तित होणे व त्याचे निरसन व कुलगुरूचे पदावर असण्याचे चालू राहणे आणि विधिग्राह्य करणारे उपबंध.**

२. (१) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९४९ हा निरसित करण्यात आला असला तरीही, उपरोल्लिखित प्रयोजनार्थ, तो अधिनियम, पुन्हा प्रवर्तित झाल्याचे, पुन्हा अधिनियमित झाल्याचे व पूर्णपणे प्रवृत्त झाल्याचे मानण्यात येईल आणि अशा रीतीने पुन्हा प्रवर्तित व पुन्हा अधिनियमित झालेल्या अधिनियमाच्या कलम १०, पोट-कलम (२) मध्ये, "पद धारण करील." या मजकुरानंतर, "परंतु नवीन कुलगुरू ज्या तारखेस अधिकारपद ग्रहण करील त्या तारखेपर्यंत, तो ते पद धारण करण्याचे चालू ठेवील." या मजकुराची नेहमीच भर घालण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.

(२) उपरोक्तप्रमाणे, अशा रीतीने पुन्हा प्रवर्तित, अधिनियमित आणि सुधारण्यात आलेला उक्त अधिनियम हा (ज्याचा यात यापुढे "पूर्वीचा अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे), दिनांक २१ मे १९७४ रोजी (ज्याचा यात यापुढे "उक्त तारीख" असा निर्देश करण्यात आला आहे) निरसित होईल व तो तसा निरसित झाल्याचे मानण्यात येईल.

(३) त्यानुसार, ज्यांच्या पदाची मुदत, दिनांक ३० नोव्हेंबर १९७२ नंतर समाप्त झाली होती तरीही ज्यांचे त्यानंतर पदावर असण्याचे चालू राहिले अशा श्रीमती शारदा दिवाण यांनी, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९४९ यान्वये, उपरोक्तप्रमाणे तो अधिनियम निरसित करण्यात येईतोपर्यंत, वैध रीत्या पद धारण करण्याचे चालू ठेवले असल्याचे मानण्यात येईल ; आणि पूर्वीचा अधिनियम निरसित करण्यात आला असला तरीही, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ अधिनियम, १९७४ (ज्याचा यात यापुढे "नवीन अधिनियम" असा निर्देश करण्यात आला आहे) यान्वये त्यानंतरही, त्यांनी वैध रीत्या पद धारण करण्याचे काम चालू ठेवले असल्याचे मानण्यात येईल आणि नवीन अधिनियमान्वये कुलगुरूची यथोचित रीत्या नियुक्ती होईतोपर्यंत त्या कुलगुरूचे पद धारण करण्याचे चालू ठेवतील.

उक्त श्रीमती शारदा दिवाण यांनी दिनांक १ डिसेंबर १९७२ रोजी आणि त्यानंतर, कुलगुरू म्हणून केलेली आणि ते पद धारण करण्याचे चालू राहिले असेल तोपर्यंत त्यांनी केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही (विद्यापीठाची प्राधिकरणे, समित्या व इतर संस्था यांच्या कामकाजात घेतलेला कोणताही भाग, करण्यात आलेले प्रतिनिधित्व, संमत केलेले आदेश धरून) ही, वैध रीत्या केलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल ; आणि त्यांच्या पदाची मुदत, दिनांक ३० नोव्हेंबर १९७२ रोजी संपली होती आणि त्यानंतर त्यांचे पदावर असणे अवैध होते किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या विधिनुसार नव्हते किंवा कुलगुरूला प्रदान करण्यात आलेल्या सर्व शक्तींचा वापर करण्यास किंवा सर्व कर्तव्ये पार पाडण्यास त्या सक्षम नव्हत्या याच केवळ कारणावरून, उपरोक्त गोष्टीविरुद्ध किंवा कार्यवाहीविरुद्ध, कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे किंवा प्राधिकरणापुढे, हरकत घेण्यात येणार नाही.

(४) पूर्वीचा अधिनियम निरसित करण्यात आला असला तरीही,—

(एक) (अ) उपरोक्तप्रमाणे, कुलगुरूचे पदावर चालू राहण्याशिवाय, पूर्वीच्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेली विद्यापीठाची अधिसभा, कार्यकारिणी व विद्यापरिषद, अभ्यास मंडळे

व इतर सर्व प्राधिकरणे, संस्था व समित्या यांचे आणि उक्त तारखेच्या लगतपूर्वी पदावर असलेले सदस्य हे अनुक्रमे नवीन अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाची (ज्याचा यात यापुढे "विद्यापीठ" असा निर्देश करण्यात आला आहे) अधिसभा, कार्यकारी व विद्यापरिषदा, अभ्यास मंडळे व इतर तत्सम प्राधिकरणे, संस्था व समित्या यांचे अनुक्रमे सदस्य असल्याचे मानण्यात येईल, आणि अधिसभेची यथोचित रीत्या रचना करण्यात आली आहे असे कुलगुरू ज्या तारखेस जाहीर करील अशा, उक्त तारखेपासून सहा महिन्यांपेक्षा उशिराची नसणाऱ्या तारखेपर्यंत, नवीन अधिनियमाखालील प्राधिकरणे, संस्था व समित्या यांना प्रदान करण्यात आलेल्या सर्व शक्तींचा वापर करतील व सर्व कर्तव्ये पार पाडतील;

(ब) अन्यथा कालप्रवाहाद्वारे असेल त्याशिवाय, अधिसभा किंवा या खंडात विनिर्दिष्ट केलेली कोणतीही प्राधिकरणे, संस्था किंवा समित्या यांच्या सदस्याचे कोणतेही पद रिकामे होईल तर, ते पद भरण्याची आवश्यकता असणार नाही :

परंतु, कुलपतीस, कुलगुरूशी विचारविनिमय केल्यानंतर, असे कोणतेही रिकामे पद कोणत्याही व्यक्तीस नामनिर्दिष्ट करून भरता येईल;

आणखी असे की, उक्त रिकामे पद भरले नाही याच केवळ कारणावरून, असे कोणतेही प्राधिकरण, संस्था किंवा समिती यांचे कोणतेही कृत्य किंवा निर्णय हा विधिअग्राह्य असणार नाही ;

(दोन) पूर्वीच्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या सर्व विद्याशाखा व विभाग हे नवीन अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्याशाखा व विभाग असल्याचे मानण्यात येईल;

(तीन) पूर्वीच्या अधिनियमान्वये जी महाविद्यालये संलग्न, घटक करण्यात आली होती, ज्या परिसंस्थांना मान्यता देण्यात आली होती व ज्या माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक शाळांची नोंदणी करण्यात आली होती व ज्यांना उक्त तारखेच्या लगतपूर्वी त्या अधिनियमान्वये विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल करण्यात आले होते अशी सर्व महाविद्यालये, परिसंस्था व शाळा ही, असे विशेषाधिकार नवीन अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये काढून घेता, निर्बंधित करता किंवा त्यात फेरबदल करता येईल तेथवर असेल त्याशिवाय, नवीन अधिनियमान्वये यथास्थिती, संलग्न, घटक, मान्यताप्राप्त किंवा नोंदणीकृत असल्याचे किंवा त्यांना विद्यापीठाचे विशेषाधिकार बहाल असल्याचे समजण्यात येईल ;

(चार) उक्त तारखेपूर्वी नोंदणी करण्यात आलेल्या किंवा नोंदणी करण्यात आल्याचे मानण्यात आलेल्या सर्व स्नातकांना नवीन अधिनियमाच्या कलम ८१, पोट-कलम (२), खंड (अ), (ब), किंवा (क) अन्वये अनर्ह ठरविण्यात आले असेल त्याशिवाय, त्यांची त्या अधिनियमान्वये नोंदणी करण्यात आल्याचे मानण्यात येईल :

परंतु, असा कोणताही स्नातक, उक्त तारखेपूर्वी महाराष्ट्र राज्यात कायद्यान्वये स्थापन करण्यात आलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाचा नोंदलेला स्नातक असेल तर नवीन अधिनियमाच्या उक्त कलम ८१, पोट-कलम (२) याच्या परंतुकान्वये आवश्यक असल्याप्रमाणे, त्याने निवड केलेली असल्याशिवाय, तो नोंदलेला स्नातक म्हणून राहण्याचे बंद होईल;

(पाच) पूर्वीच्या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या विद्यापीठाची सर्व मालमत्ता—स्थावर किंवा जंगम, सर्व अधिकार, हितसंबंध—मग तो कोणत्याही प्रकारचा असो, शक्ती व विशेषाधिकार विद्यापीठाकडे हस्तांतरित होतील व आणखी हस्तांतरणाशिवाय, ती विद्यापीठाकडे निहित होतील व ज्याकरिता विद्यापीठाची रचना करण्यात आली असे उद्देश व प्रयोजने यांच्यासंबंधात त्यांचा वापर करण्यात येईल;

(सहा) पूर्वीच्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाने स्वीकारलेली किंवा त्यास मिळालेली व उक्त तारखेच्या लगतपूर्वी त्या विद्यापीठाने धारण केलेली सर्व धर्मदाने ही, नवीन अधिनियमान्वये विद्यापीठाने स्वीकारली असल्याचे किंवा त्यास ती मिळाली असल्याचे किंवा त्याने ती धारण केलेली असल्याचे मानण्यात येईल, अशी धर्मदाने ज्यांन्वय स्वीकारण्यात आली होती किंवा मिळाली होती किंवा धारण करण्यात आली होती अशा सर्व शर्ती नवीन अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाशी विसंगत असल्या तरीही, या नवीन अधिनियमान्वय विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल;

(सात) उक्त तारखेपूर्वी पत्करलेली व पूर्वीच्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाच्या नावे कायदेशीररीत्या अस्तित्वात असलेली सर्व ऋणे, दायित्वे व बंधने विद्यापीठाकडून पार पाडण्यात येतील व त्यांची पूर्तता करण्यात येईल;

(आठ) ज्यामध्ये, पूर्वीच्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाच्या नावे केलेले कोणतेही मृत्युपत्रित दान, देणगी, शर्ती किंवा विश्वस्त व्यवस्था यांचा अंतर्भाव असेल असे कोणतेही मृत्युपत्र, विलेख किंवा इतर लेख यांमध्ये, पूर्वीच्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाऐवजी नवीन अधिनियमान्वये रचना करण्यात आलेले विद्यापीठ आहे असे समजून उक्त तारखेस, उक्त मृत्युपत्र, विलेख किंवा इतर लेख यांचा अर्थ लावण्यात येईल;

(नऊ) पूर्वीच्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाच्या संबंधातील कोणत्याही अधिनियमितीमधील किंवा अधिनियमिती अन्वये केलेले इतर विलेख यांमधील सर्व निर्देश यांचा अन्वयार्थ विद्यापीठाच्या संबंधातील निर्देश असल्याप्रमाणे लावण्यात येईल;

(दहा) पूर्वीच्या अधिनियमान्वये वैध रीत्या करण्यात आलेली, व उक्त तारखेच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेली, त्या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेल्या विद्यापीठाचा कुलसचिव व सर्व इतर अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती, नवीन अधिनियमान्वये व त्या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल; व शर्तींमध्ये सक्षम प्राधिकाऱ्याकडून जितक्या मर्यादेपर्यंत फेरफार करण्यात येईल तितक्या मर्यादेपर्यंत असेल त्याशिवाय, कुलसचिव व असे इतर अधिकारी आणि कर्मचारी हे, त्यांच्या पदावधीच्या किंवा सेवायोजनाच्या अटींचे नियमन करणाऱ्या शर्तींच्या अधीन, पद धारण करण्याचे व कार्य करण्याचे चालू ठेवतील;

(अकरा) पूर्वीच्या अधिनियमान्वये वैध रीत्या केलेली व उक्त तारखेच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेली परीक्षकांची नियुक्ती ही नवीन अधिनियमान्वये व त्या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल, व असे परीक्षक हे, नवीन अधिनियमान्वये नवीन नेमणुका होईतोपर्यंत पद धारण करण्याचे व कार्य करण्याचे चालू ठेवतील;

(बारा) पूर्वीच्या अधिनियमान्वये केलेले सर्व परिनियम, आदेश (Ordinances), विनियम व नियम किंवा काढण्यात आलेल्या सर्व नोटिसा व आदेश हे, असे परिनियम, आदेश (Ordinances) विनियम, नियम, नोटिसा व आदेश हे नवीन अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहील व नवीन अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये केलेले परिनियम, आदेश (Ordinances), विनियम, नियम किंवा काढण्यात आलेल्या नोटिसा व आदेश यांन्वये त्यांचे अधिक्रमण होईपर्यंत किंवा त्यांत फेरफार होईपर्यंत, ते नवीन अधिनियमान्वये करण्यात आले असल्याचे किंवा काढण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, पूर्वीच्या अधिनियमान्वये करण्यात आलेला व उक्त तारखेच्या लगतपूर्वी अंमलात असलेला कोणताही परिनियम, आदेश (Ordinance), विनियम, नियम किंवा काढण्यात आलेली कोणतीही नोटीस किंवा आदेश हा, असा परिनियम, आदेश (Ordinance), विनियम, नियम करण्याची किंवा नोटीस किंवा आदेश काढण्याची शक्ती नवीन अधिनियमान्वये वेगळ्याच प्राधिकरणाकडे किंवा संस्थेकडे किंवा अधिकाऱ्याकडे निहित आहे किंवा तत्संबंधीचा विषय किंवा नवीन अधिनियमान्वये करण्यात यावयाचा विलेख हा फक्त वेगळ्याच दुय्यम विधिविधानाच्या स्वरूपात अनुज्ञेय आहे याच केवळ कारणावरून, नवीन अधिनियमाच्या उपबंधांशी विसंगत असल्याचे मानण्यात येणार नाही.

(५) पूर्वीच्या अधिनियमाच्या निरसनाच्या परिणामासंबंधात, लगतपूर्ववर्ती पोट-कलमातील विशिष्ट बाबींच्या उल्लेखामुळे, मुंबई सामान्य परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ सर्वसाधारणत: लागू करण्यास बाध येत असल्याचे किंवा त्यावर परिणाम करीत असल्याचे मानण्यात येणार नाही.

सन १९७४ चा महाराष्ट्र अध्यादेश चौदा याचे निरसन व व्यावृत्ती.

३. (१) श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (विधिग्राह्य करणारे उपबंध) अध्यादेश, १९७४ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) (अध्यादेश) अशा रीतीने निरसित करण्यात आला असला तरीही, अशा रीतीने निरसित केलेल्या अध्यादेशाद्वारे किंवा तदन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये केलेली गोष्ट किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

वा. स. कुलकर्णी,

भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.